महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र.नाविमं/प.उ.मा./3321
नागपूर, दि. 30/10/2024

प्रति,
मा. संचालक,
माहिती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषय :– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु./मार्च 2025 परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांचे नांव नोदणी अर्ज अतिविलंबाने स्विकारण्याच्या तारखांबाबत

संदर्भ :– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र/परीक्षा– 03/4306, दिनांक 29/10/2024.

महोदय,

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु./मार्च 2025 परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी प्रक्रियेबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) सचिव, राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय, यांना कळविण्याचे कार्यवाहीस्तव.
4) मा. संपादक, दैनिकभास्कर, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, तरूण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४
## खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज
### • प्रकटन •

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्च २०२४ परीक्षेपासून संपर्क केंद्र बंद करुन सर्व माध्यमिक शाळांमधून फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इ. १०वी व इ. १२वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

तरी सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेऊन शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इ. ५वी उत्तीर्ण असलेल्या मुला–मुलींना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसून शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१ फेब्रु–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) अतिविलंब शुल्काने ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत –

### अतिविलंब शुल्कासह निर्धारीत मुदत

| अ. क्र. | तपशील (खाजगी विद्यार्थी) अतिविलंब शुल्क | नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्काने ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १ | इ. १०वी व इ. १२वी अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.२०/– | गुरूवार दिनांक ३१/१०/२०२४ ते मंगळवार दिनांक ३१/१२/२०२४ |

२ खाजगी विद्यार्थ्यांना इ. १०वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळाचा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.या संदर्भात अधिक माहितीसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

४ विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला(मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५ **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.**

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४

दिनांक – २९ /१०/२०२४